# शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन एज्युकेशन २०२६-२७

शिक्षण उद्यासाठी असते उद्याचे सुजाण ., सतर्क, सर्जनशील, कर्तबगार व सुसंस्कृत नागरिक घडविणे खऱ्या, उचित व उत्तम शिक्षणाकडून अपेक्षित असते . शिकावे कसे, शिकण्याचा आनंद कसा घ्यावा द्यावा आणि आजन्म शिकत कसे-शिकता जे उद्याची आव्हाने पेलायला -शिकता .राहावे हे शिकविते ते खरे शिक्षण सज्ज करते, उद्याच्या संधींचे सोने करायला शिकवते ते खरे शिक्षण .याच शिक्षण क्षेत्रांत नवीन प्रयोग, संशोधन करणाऱ्या महाराष्ट्रातील तरुणांना संशोधनाची संधी मिळावी त्यांच्यातील नव्या कल्पनाना वाव मिळावा आणि प्रयोगांना चालना मिळावी, तसेच शैक्षणिक, सामाजिक प्रश्नांना उत्तर शोधण्यासाठी उमेद मिळावी, या उद्देशाने यशवंतराव चव्हाण सेंटरतर्फे शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन एज्युकेशन देण्यात येते. ही फेलोशिप २० प्राथमिक शिक्षकाना आणि १० माध्यमिक शिक्षकाना दिली जाते. शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या तरुणांना सक्षम बनवणे आणि त्यांच्या संशोधनात्मक कामाला चालना देणे, हे मुख्य उद्दिष्ट या फेलोशिपचे आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण -२०२०मध्ये सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची प्रभावी अंमलबजावणी, त्यामधील साधने व तंत्राचा परिणामकारक रीतीने उपयोग करावा, असे सुचविले आहे.मूल्यांकनाचे ध्येय सातत्यपूर्ण आणि आकारिक क्षमता आधारित असावे, असेही अपेक्षित आहे .चिकित्सक विचार,वैचारिक स्पष्टता,विश्लेषण क्षमता या उच्च बोधात्मक क्षमतांची तपासणी हे मूल्यांकनातून अपेक्षित आहे. ( संदर्भ :४. ३४ राष्ट्रीय शिक्षण धोरण -२०२० ) राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२०मध्ये मूल्यांकन हे अध्ययन आणि विकास यांना गती देणारे आहे.

विद्यार्थ्यांचे अध्ययन योग्य तऱ्हेने व्हावे ,शिक्षक, विद्यार्थी आणि संपूर्ण शालेय शिक्षण प्रणालीला फायदा व्हावा अशी मूल्यांकन प्रक्रिया असावी. सर्व विद्यार्थ्यांसाठी अध्ययन आणि विकास अनुकूल करण्यासाठी अध्ययन -अध्यापन प्रक्रियेत सातत्याने सुधारणा करण्यास हे मूल्यांकन मदत करेल.

शिक्षणाच्या सर्व स्तरांसाठी मूल्यांकनाचे हे मूलभूत तत्त्व असेल.राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० व राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा-२०२३ यांमध्ये मूल्यांकन प्रक्रियेचे विश्लेषण वरीलप्रमाणे करण्यात आलेले आहे.

यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई ,शिक्षण विकास मंच यांच्यावतीने यावर्षी शरद पवार इन्स्पायर फेलोशिपसाठी शालेय शिक्षणातील मूल्यांकन प्रक्रियेला केंद्रस्थानी मानून शिक्षकांकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.या फेलोशिपसाठी आपण निवडलेल्या विषयाच्या माध्यमातून मूल्यांकन प्रक्रियेतील नवोपक्रम पूर्णत्वास जाईल व तो नवोपक्रम इतर शिक्षकांना मार्गदर्शक ठरेल.शरद पवार इन्स्पायर फेलोशिपसाठी शालेय स्तरावरील मूल्यांकन प्रक्रियेच्या विविध पैलूंवर नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून मूल्यांकन विषयक प्रकल्पासाठी काम करू इच्छिणाऱ्या शिक्षकांसाठी ही एक पर्वणी असेल.यामधून क्षमताआधारित मूल्यांकन प्रक्रियेच्या विविध पैलूंवर अधिकाधिक परिणामकारक पद्धतीने काम करता येईल.

या फेलोशिपसाठी प्रस्ताव दाखल करण्यापूर्वी पुढील गोष्टी करा:

१) राष्ट्रीय शिक्षण धोरण - २०२०, राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा - २०२३ (शालेय शिक्षण), राज्य अभ्यासक्रम आराखडा - २०२४ ( शालेय शिक्षण ), शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण २.० मार्गदर्शिका या व इतर आनुषंगिक संदर्भांमधील मूल्यांकन संकल्पना व प्रक्रियेचा अभ्यास करा .

२) मूल्यांकन नवोपक्रम तयार करून तो राबविण्यासाठी सोबतच्या टिपणीत दिलेल्या विषयनिहाय मूल्यांकन कृतींपैकी योग्य कृतींची निवड करा.

३) इयत्ता, विषय ,घटक व संबंधित विषयाच्या अध्ययन निष्पत्ती व मूल्यांकन प्रकार ( आकारिक / संकलित ) आहे ,यांचा विचार करा.

४) राष्ट्रीय शिक्षण धोरण - २०२० नुसार नवीन अभ्यासक्रम व पाठ्यक्रमाची २०२५ -२६ पासून टप्प्याटप्याने अंमलबजावणी करण्यासंदर्भात शासन निर्णयानुसार पाठ्यपुस्तकांची निवड करा. ( संदर्भ - शासन निर्णय दिनांक १६ एप्रिल २०२५ )

५) अध्ययन- अध्यापन प्रक्रियेमध्ये वापरल्या जाणाऱ्या कृती  मूल्यांकनासाठी उपयोगात येतील.क्षमता आधारित मूल्यांकनासंदर्भातील अध्ययन अनुभव व कृतींचे नियोजन करा.

६) सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनातील विविध साधने व तंत्रे यांचा विचार करा.

७) अध्ययनाचे मूल्यांकन, मूल्यांकनातून अध्ययन यांचा विचार करा.

८) मूल्यांकन प्रक्रियेत इयत्ता व विषयवार साधने व तंत्रांचा  आवश्यकतेप्रमाणे वापर करा.

९) विद्यार्थ्यांच्या ज्ञान, कौशल्ये, सर्जनशीलता, विचारशक्ती, मूल्यव्यवस्था यांचा एकत्रित विकास मोजण्यासाठी लवचिक आणि विविध पद्धती वापरण्यावर भर द्या.

१०) समग्र प्रगतीपत्रक HPC चा अभ्यास करून अंकांऐवजी वर्णनात्मक अभिप्रायांना महत्त्व द्या .

११) पालक, शिक्षक व विद्यार्थी यांचा  सहभाग असलेले ३६०° मूल्यांकन समजून घ्या .

१२) 'रुब्रीक्स '(मूल्यांकन निकष आराखडा )  चा प्रभावी वापर करा . : मूल्यांकनाचे स्पष्ट निकष, कामगिरीचे स्तर ( उदा . उत्कृष्ट, चांगले, समाधानकारक, सुधारणा आवश्यक), गुण, श्रेणी व वर्णनात्मक मापदंड, पारदर्शकता व वस्तुनिष्ठता अशा वैशिष्ट्यांसह रुब्रीक्सचा परिणामकारक उपयोग या मूल्यांकन प्रक्रियेमध्ये करा .

मूल्यांकन विषयक नवोपक्रम करताना इयत्ता,स्तर, विषय व अध्ययन निष्पत्तींनुसार पुढील काही मूल्यांकन कृतींचा यासाठी उपयोग होईल:

१. भाषा

इयत्ता गट पद्धती तपशील

इयत्ता पहिली ते चौथी शाब्दिक खेळ “शब्दसाखळी”, “अक्षरकोडी”, “कोणतं अक्षर हरवलं?”, “शब्द ओळखा”

इयत्ता पाचवी ते आठवी कथाकथन/भूमिका वठविणे कथेला नवा शेवट, लघुनाटिका, संवादवाचन, शब्दकोडी, इयत्ता ९वी - १० वी साठी विद्यार्थ्यांनी हस्तलिखित तयार करणे.
नववी ते बारावी विचारमंथन/वादविवाद दिलेल्या विषयावर भूमिका मांडणे, गटचर्चा, संपादकीय लेखन

२. गणित
इयत्ता गट पद्धती तपशील
पहिली ते चौथी गणिती कोडी आकृती जुळवा, संख्यांची जोडणी, पॅटर्न ओळख, सापशिडी
पाचवी ते आठवी दैनंदिन जीवनातील गणित खरेदी-विक्री मोजमाप, नकाशा वाचन, वेळ व अंतर मोजणी
नववी ते बारावी प्रोजेक्ट पद्धत सांख्यिकी सर्वेक्षण, डेटा विश्लेषण, 3D मॉडेल तयार करणे

३. विज्ञान
इयत्ता गट पद्धती तपशील
पहिली ते चौथी निरीक्षण क्रिया पानांची रचना, प्राण्यांचे आवाज, हवामान बदल
पाचवी ते आठवी प्रयोग सादरीकरण साधे विज्ञान प्रयोग, 'का झाले?' प्रश्नोत्तरे, प्रकल्प
नववी ते बारावी संशोधन प्रकल्प स्थानिक पर्यावरणाचा अभ्यास, नवीकरणीय ऊर्जेवर मॉडेल तयार करणे

४. सामाजिक शास्त्रे
इयत्ता गट पद्धती तपशील
पहिली ते चौथी चित्रकथा, इतिहासातील प्रसंग चित्रातून सांगणे
पाचवी ते आठवी भूमिका साकारणे, ऐतिहासिक व्यक्तिरेखा वठविणे, नकाशा खेळ

नववी ते बारावी केस स्टडी विश्लेषण, वर्तमान घडामोडींचे विश्लेषण, स्थानिक समस्यांवर उपाययोजना सुचविणे

५. कलाशिक्षण
पोस्टर तयार करणे, हस्तकला, गीत-नृत्य सादरीकरण

६. शारीरिक शिक्षण व निरामयता
मिनी-गेम्स, गटातील नेतृत्व कौशल्याचे मूल्यांकन

७. कार्यशिक्षण/पूर्व व्यावसायिक शिक्षण/व्यावसायिक शिक्षण
समस्या सोडविणे, वेळ व्यवस्थापन, गट निर्णय क्षमता.

८. आंतरविद्याशाखीय शिक्षण
पर्यावरण शिक्षण (१० वी), समाजातील व्यक्ती (९वी)
मुलाखती, सर्वेक्षण, क्षेत्रभेट, प्रकल्प

वरील शालेय विषयांसाठी पुस्तकासह चाचणी ( Open Book Test ) च्या माध्यमातून विश्लेषण, चिकित्सक विचार, अन्वयार्थ लावणे, संदर्भ शोधणे, अर्थाची व्यापकता शोधणे यांसोबत विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्तीला व सर्जनशीलतेला चालना देऊन तणावरहित मूल्यांकन करता येते.
यांशिवाय Jigsaw puzzles, Reverse Engineering सारख्या कृतींचा भाषा, गणित व विज्ञान या विषयांच्या मूल्यांकनासाठी उपयोग करता येईल.

AI आधारित मूल्यांकन-

"लर्निंग पोर्टफोलिओ” (Learning Portfolio)

• विद्यार्थ्यांनी वर्षभरात केलेल्या कामांचे संकलन: प्रकल्प, निबंध, चित्रं, ऑडिओ/व्हिडीओ, अभिव्यक्ती.यामध्ये शिक्षक, पालक आणि विद्यार्थी स्वतः

अभिप्राय व प्रतिक्रिया लिहू शकतात.जर साहित्य व सोय उपलब्ध असेल तर डिजिटल प्लॅटफॉर्मवरही ठेवता येईल (e-portfolio).

Reflective Journals ( स्वतःला जाणून घ्या )

प्रत्येक आठवड्याला विद्यार्थी स्वतःचे विचार लिहतात: काय शिकले? काय जमले/नाही जमले? यातून Metacognition (स्व-शिक्षणाची समज) विकसित होते.

“मित्र-मूल्यांकन” — Learning , Teaching and Feedback.दोन विद्यार्थी एकमेकांच्या कार्याचे निरीक्षण करून सूचना देतात.

शिस्त, सहभाग, सहकार्य, संवाद या बाबतीत मूल्यमापन करता येते.

“छोटे शिक्षक” उपक्रम

विद्यार्थी इतर वर्गात शिक्षण देतात, कार्यशाळा घेतात, त्यातून नेतृत्व, संवादकौशल्य, तयारी यांचे मूल्यमापन होते.

“रोल प्ले” व नाट्याद्वारे मूल्यांकन

• विशिष्ट समस्यांवर आधारित भूमिका घेऊन विद्यार्थ्यांनी चर्चा करावी.त्यातून विचारशक्ती, सहानुभूती, समस्या सोडवण्याची क्षमता दिसून येते.

गटाने केलेल्या प्रकल्पांचे मूल्यमापन करताना वैयक्तिक कामाची नोंद : प्रकल्पानुसार / विषयानुसार निकष ठरवणे.

"पोर्टफोलिओ - विद्यार्थ्यांच्या वर्षभरातील वेगवेगळया प्रकारच्या कामातील प्रगती पाहण्यासाठी Graded आणि Varied tasks देणे

वेगवेगळया विषयांतील एखादी Theme, सूत्र ठरवून केलेल्या कामाच्या मूल्यमापनाची नोंद ठेवावी .

अध्ययन आणि विकासाला चालना देण्यासाठी विश्लेषण, चिकित्सक विचार आणि संकल्पनात्मक स्पष्टता यासारख्या उच्च अध्ययन कौशल्यांची चाचणी आणि 'निदान' हा मूल्यांकनाचा प्राथमिक उद्देश असेल.त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांचा शिक्षणातून सर्वतोपरी विकास करण्यास मदत होईल .शिक्षणाच्या सर्व स्तरावरील मूल्यांकनासाठी हे मूलभूत तत्व ठरविण्यात आले आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण -२०२० व राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा - २०२३ मधून मूल्यांकन प्रक्रिया वरीलप्रमाणे स्पष्ट करण्यात आलेली आहे.आगामी काळात ही मूल्यांकन प्रक्रिया अधिक परिणामकारक व प्रभावी रीतीने राबविण्यासाठी शिक्षकांना चालना मिळावी,या उद्देशाने शरद पवार इन्स्पायर फेलोशिपच्या आहे , या माध्यमातून मूल्यांकनाशी संबंधित नवोपक्रमांचा संग्रह तयार होईल. यशवंतराव चव्हाण सेन्टर, शिक्षण विकास मंचची भूमिका संग्राहकाची ( Repository ) राहील.या नवोपक्रम संग्रहातील मूल्यांकन नमुने आवश्यकतेनुसार राज्यभरातील शिक्षकांना उपलब्ध करून दिले जातील.

शरद पवार इन्स्पायर फेलोशिपसाठी नवोपक्रम निवडताना पुढील बाबी लक्षात घ्या.

- आपण शिकवत असलेला आपल्या आवडीचा शालेय विषय निवडा.
- आपण शिकवत असलेल्या कोणत्या तुकडीत हा नवोपक्रम अंमलात आणायचा ते ठरवा.
- एका संपूर्ण शैक्षणिक सत्रासाठी निवड केलेल्या विषयाच्या सर्व घटकांच्या अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी नवोपक्रम राबवायचा आहे.
- मूल्यांकनासाठी वरील टिपणीत दिलेल्या कृतींपैकी योग्य अशा आणि त्यांना सुसंगत अशा इतर कृतींचा वापर करा.

ह्या निवेदनात दिलेल्या सर्व बाबींचा विचार करून शरद पवार इन्स्पायर फेलोशिपसाठी विहित नमुन्यात प्रस्ताव सादर करावा .

## *फेलोशिपसाठी नियमावली*

१) आपण ज्या संस्थेत काम करीत आहात त्या संस्थेचे ‘नवोपक्रम’ करण्यासाठी तुम्हाला परवानगी दिल्याचे पत्र सुरुवातीसच द्यावे लागेल.
२) आपण जो नवोपक्रम हाती घेणार आहात तो यापूर्वी केलेला नसावा. मात्र पूर्वी केलेल्या प्रयोगाचे विस्तारीकरण (Extension ) करता येईल.
३) आपण करीत असलेला नवोपक्रम इतर कोणत्याही संस्थेत सादर केलेला नसावा तसेच पुढेही तो सादर करता येणार नाही.
४) आपण घेतलेला उपक्रम कोणाचीही कॉपी असू नये. जर दुसऱ्याची एखादी कल्पना घेवून काम करणार असाल तर तशी त्या व्यक्तीची पूर्वपरवानगी घेतलेली असावी.
५) यशवंतराव चव्हाण सेंटर, ज्या ज्या वेळी यासंबंधीची प्रशिक्षणे किंवा बैठका घेईल त्यावेळी अशा बैठकास किंवा प्रशिक्षणास उपस्थित राहणे बंधनकारक राहील. अपरिहार्य अडचण असेल तर तशी कल्पना यशवंतराव चव्हाण सेंटरला देवून परवानगी घ्यावी.
६) यशवंतराव चव्हाण सेंटरनी दिलेल्या वेळेतच आपला उपक्रम पूर्ण करणे अपेक्षित आहे. उपक्रमास उशीर झाला तर आपल्या फेलोशिपबाबतचा अंतिम निर्णय चव्हाण सेंटरला असेल.
७) आपला उपक्रम चालू असताना यशवंतराव चव्हाण सेंटरचे प्रतिनिधी कधीही तरीही पूर्व कल्पना देवून भेट देण्यास येतील. त्यावेळी त्यांना सहकार्य करणे अपेक्षित आहे. जर या प्रतिनिधिंना कामाबाबत चुकीच्या गोष्टी ध्यानात आल्या तर फेलोशिप संबंधी यशवंतराव चव्हाण सेंटर निर्णय घेईल.
८) नवोपक्रम अंतिम अहवाल सादर करताना आपल्या संस्था प्रमुखाचे पत्र जोडणे आवश्यक आहे.

**अर्ज प्रक्रिया**

| | |
|---|---|
| १. | इच्छुक शिक्षकांनी दिनांक १२ ऑक्टोबर २०२५ पूर्वी<br><br>https://apply.sharadpawarfellowship.com या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावा |
| २. | अर्जदारांनी फेलोशिपसाठी हाती घेत असलेल्या नवोपक्रम विषयी खालील मुद्दयांच्या आधारे सुमारे १००० शब्दांमध्ये (मराठी किंवा इंग्रजी भाषेत) .अर्जामध्ये दिलेल्या जागेत लिहावे |
| | **२.१ उपक्रमाचे शीर्षक** |
| | **२.२ उपक्रमाची गरज आणि महत्त्व**<br><br>**उपक्रम निवडण्याचे कारण, वेगळेपण आणि उपयुक्तता याबाबतचा तपशील** |
| | **२.३ उपक्रमाची उद्दिष्टे**<br><br>हा उपक्रम आपण का निवडला आणि त्याचा काय फायदा, कोणाला होणार आहे, कशाप्रकारे होणार याबाबतचा तपशील. |
| | **२.४ उपक्रमाची वैशिष्ट्य**<br>**अ. उपक्रमपूर्व स्थिती**<br>**आ. संबंधित व्यक्तीतज्ज्ञ यांच्याशी चर्चा/**<br>**इ. उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेल्या साधनांचा विचार**<br>**ई. उपक्रमांतर्गत कृतींचे टप्पे आणि त्यांचे क्रम (संभाव्य वेळापत्रकासह)**<br>**उ. अपेक्षित उपक्रमोत्तर कृती**<br>**ऊ. उपक्रमाची अंमलबजावणी केल्याबद्दल सादर करावयाचे पुरावे** |
| | **२.५ उपक्रमाची अपेक्षित फलनिष्पत्ती** |
| ३. | **आपण प्रस्तावित करीत असलेला उपक्रम हा नवीन असावा.** |

*फेलोशिपच्या अर्ज प्रक्रियेचे वेळापत्रक*

| | | |
|---|---|---|
| १ | फेलोशिपची घोषणा | १५ ऑगस्ट २०२५ |
| २ | ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत | १५ ऑगस्ट २०२५ ते १२ ऑक्टोबर २०२५ |
| ३ | आलेल्या अर्जाची छाननी आणि निवडक उमेदवारांच्या ऑनलाइन मुलाखती | १३ ऑक्टोबर २०२५ ते २० नोव्हेंबर २०२५ |
| ४ | अंतिम निवड झालेल्या उमेदवारांची घोषणा | 1 डिसेंबर २०२५ |
| ५ | फेलोशिप प्रदान सोहळा कार्यक्रम | १४ डिसेंबर २०२५ |

*फेलोशिपचा कालखंड: मे २०२६ ते मे २०२७*

| | | |
|---|---|---|
| १ | फेलोज सोबत ऑनलाईन मिटींग | १८ जानेवारी २०२६ |
| २ | प्रथम कार्यशाळा | ८,९,१० मे २०२६. |
| ३ | प्रकल्पाना भेटी | डिसेंबर२०२६ ते जानेवारी २०२७ |
| ४ | द्वितीय कार्यशाळा | २१,२२ नोव्हेंबर २०२६ |
| ५ | तृतीय कार्यशाळा | ६,७ फेब्रुवारी २०२७ |
| ६ | अंतिम कार्यशाळा आणि अहवाल सादरीकरण | मे २०२७ |

**निवड प्रक्रिया**

१) तज्ज्ञ समितीकडून अर्जांची छाननी पूर्ण करण्यात येईल .
२) पात्रतेचे निकष अधिक गुणवत्तेने पूर्ण करणाऱ्या मोजक्याच शिक्षकांची तज्ज्ञांतर्फे दूरस्थ मुलाखतींसाठी निवड करण्यात /प्रत्यक्ष (आवश्यकतेनुसार शाळाभेटीसह) .येईल
३) मुलाखत शक्यतो इच्छुक शिक्षकांनी अर्जासोबत पाठविलेल्या टिपणावर आधारित असेल.
४) मुलाखतीच्या गुणवत्तेच्या मूल्यमापनानुसार फेलोशिपसाठी ३० शिक्षकांची २०) (माध्यमिक शिक्षक प्राथमिक आणि १०निवड करण्यात येईल .
५) निवड झालेल्या शिक्षकांशी संपर्क साधून त्यांची फेलोशिप स्वीकारण्याविषयीची लेखी अनुमती घेण्यात येईल .
६) आवश्यकतेनुसार त्यांच्या शाळेच्या मुख्याध्यापकांचीही सहसंमती घेण्यात येईल.

**पूर्वतयारी:**

जानेवारी २०२६ ते मे २०२७ या कालावधीत खालील गोष्टी करण्यात येतील:

१) निवड झालेल्या फेलोजचे किमान ३ दिवसांचे प्रशिक्षण शिबीर.
२) फेलोने हाती घ्यावयाच्या उपक्रमांचे सादरीकरण व चर्चेअंती निश्चिती,फेलोच्या नियोजित उपक्रमांचे व त्यांच्या मूल्यमापनाचे नियोजन, संसाधनांची जुळवाजुळव तसेच सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड, पालकांची अनुमती, मासिक व अंतिम प्रकल्पअहवालांची रूपरेषा-, इ.
३) गट निहाय मेंटर्स नेमेणे .

**फेलोशिपमधील उपक्रमाचा कालावधी:**

१) **मे २०२६ ते मे २०२७** असेल .
२) **या** कालावधीत फेलोजनी वर निश्चित केलेले उपक्रम करून त्यांचे **मासिक अहवाल** प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेला देणे अनिवार्य राहील .
३) एप्रिल २०२७ मध्ये फेलोजनी सविस्तर अहवाल लेखन करून संयोजकांकडे पाठविणे अपेक्षित आहे (हार्ड आणि सॉफ्ट कॉपी ).

**फेलोशिप सांगता शिबीर:**

१) एप्रिल .दिवसांचे सांगता शिबीर आयोजित करण्यात येईल मध्ये २ मे २०२७/
२) या शिबिरामध्ये सर्व फेलोज् चे त्यांच्या मार्गदर्शकांच्या उपस्थितीत सादरीकरण होईल व त्यावर इतर तज्ज्ञांबरोबर चर्चाही होतीलत्यात फेलोशिपनंतर शैक्षणिक . परिवर्तनाच्या प्रयत्नांचे सातत्य राखण्याविषयी सूचना देण्यात येतील .

३) प्रशस्तीपत्रांचे वितरण व फेलोज् नी केलेल्या उपक्रमांचे फेलोशिप पोर्टलवर प्रकाशन करण्यात येईलविद्यार्थी :पुढे पोर्टलला योग्य ती प्रसिद्धी देऊन राज्यातील विशेषत ., पालक व शिक्षकांपर्यंत ते उपक्रम पोहोचविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील .

४) या पोर्टलवर फेलोज् चे ब्लॉग्ज, इतर शिक्षकांचे प्रतिसाद, सूचना, प्रश्नांना उत्तरे, इ . उत्तरोत्तर या पोर्टलवर अशा उपक्रमांची महासूची तयार .सेवा सुरू करता येतील होईल व शैक्षणिक परिवर्तन करू इच्छिणाऱ्या शेकडो शिक्षकांना ती मार्गदर्शक व स्फूर्तीदायक ठरेल.

**फेलोशिपचे तपशील**

| | |
|---|---|
| फेलोशिपसाठी वयोमर्यादा | वय वर्षे ४५ किंवा त्यापेक्षा कमी वय असणारे पूर्णवेळ शिक्षक |
| फेलोशिपचा कालावधी | मे २०२६ ते एप्रिल/मे २०२७ |
| फेलोशिपसाठी पात्रता | १. परिशिष्टामध्ये अंतर्भूत केलेल्या उद्दिष्टांशी सुसंगत, नियमित अध्यापन करत विद्यार्थ्यांच्या सहभागाने चालणारे व<br>२. वर्षभर विकसित होत जातील असे अभ्यासक्रमेतर व वेळापत्रकेतर उपक्रम करत असलेले/ करू इच्छिणारे शिक्षक अर्ज करण्यासाठी पात्र समजण्यात येतील. तसेच २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात बदली न होणाऱ्या शिक्षकानी अर्ज करावा. |
| फेलोशिपची संख्या | २० प्राथमिक आणि १० माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक असे एकूण ३० |
| अर्जदारांचे कार्यक्षेत्र | महाराष्ट्र असेल |
| फेलोशिपची रक्कम | निवड झालेल्या प्रत्येक शिक्षकास वार्षिक ६०,०००/- (रुपये साठ हजार फक्त). यातील ६०% रक्कम शिक्षकाना प्रत्यक्षात फेलोशिपमधील उपक्रमांसाठी लागणारी साधने, संभाव्य प्रवास, इत्यादीसाठी देण्यात येईल आणि उर्वरित ४० % रक्कम ही कार्यशाळा आणि मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनासाठी खर्च करण्यात येईल. |

अर्ज प्रक्रिया

१. इच्छुक शिक्षकांनी दिनांक १२ ऑक्टोबर २०२५ अखेर https://apply.sharadpawarfellowship.com या संकेत स्थळावर ऑनलाईन अर्ज करावा.

२. अर्जदारांनी फेलोशिपसाठी हाती घेत असलेल्या "शैक्षणिक नवोपक्रमा" विषयी खालील मुद्दयांच्या आधारे सुमारे १००० शब्दांमध्ये (मराठी किंवा इंग्रजी भाषेत) अर्जामध्ये दिलेल्या जागेत लिहावे.

२.१ उपक्रमाचे शीर्षक

२.२ उपक्रमाची गरज, उपक्रम आपण का निवडला

२.३ उपक्रमाचे महत्व

२.४ उपक्रमाचे नाविन्य व वेगळेपण - शासकीय योजनेपेक्षा वेगळे परंतु शासकीय योजनांना पूरक

२ आपण यापूर्वी काही नवोपक्रम केले आहेत काय ५.?

२ यापूर्वी शासनास किवां इतर संस्थेस आपण काही नवोपक्रम सदर केले आहेत काय ६. ?

२ आपल्या नवोपक्रमाची दखल घेतली गेली आहे काय ७.?

असल्यास कोणत्या स्तरापर्यंत

जिल्हास्तर ☐

राज्यस्तर ☐

राष्ट्रीयस्तर ☐

२.८ उपक्रमासाठी लागणारी साधने व सोयी

२.९ आपला उपक्रम साधारण किती दिवस चालेल ?

३.० आपल्या उपक्रमाचे स्थूल वेळापत्रक

३.१ उपक्रमाची फलनिष्पत्ती पाहण्यासाठीची व्यवस्था

३.४ उपक्रमासाठीचे  अंदाजपत्रक

३.५ उपक्रमासाठीचे वेळापत्रक

४ . आपण प्रस्तावित करत असलेला उपक्रम पूर्वीपासून राबवत असाल तर त्याचा तपशील (छायाचित्र, चित्रफित, परखड मूल्यमापन इ.) अर्जासोबत जोडावे.

प्रतिज्ञा पत्र शासकीय किंवा निमशासकीय /मी हा उपक्रम यापूर्वी कोणत्याही खाजगी :
.संस्थेस सादर केलेला नाही

**संपर्क:**


**योगेश कुदळे**

शिक्षण विभाग प्रमुख
यशवंतराव चव्हाण सेंटर,

**संजना पवार**

सहाय्यक, शिक्षण विभाग
संपर्क – 8291416216

जन.जगन्नाथराव भोसले मार्ग,
नरिमन पॉईंट, मुंबई – ४०००२१

ई-मेल आयडी – education@chavancentre.org

फोन नं : +91 93707 99791


**अरविंद शिंगाडे- 9423445668**

'शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन एज्युकेशन' साठी आपण जो विषय निवडणार आहात त्याबाबत आपल्या काही शंका असतील तर अरविंद शिंगाडे (9423445668) यांना व्हॉट्सॲप मॅसेज करून विचाराव्यात.